दिवाणी डायरी अर्ज क्र. ०१/२०१८
CNR-MHSI06-000103-2018
नि. १ खालील आदेश

सदरचा अर्ज अर्जदार यांनी नियमित दिवाणी मुकदमा क्र. १८३/२०१३ या दाव्याचा निकाल दिनांक ०२/१२/२०१५ रोजी झालेला असून सदरचा दावा हा हक्कप्रस्थापना व धडेवाटपासाठी दाखल केलेला होता व तो दावा मंजूर होवून सदर दाव्याच्या न्यायनिर्णयामध्ये परिच्छेद क्र. २ मधील दावा 'अ' मिळकतीच्या वर्णनामध्ये अ.क्र.२ ची मिळकत ही स.क्र.६२ हि.क्र. ६ असे टंकलिखित झालेले आहे. वादीने दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये अ.क्र. २ ची मिळकत ही स.क्र. ६३ हि.क्र. ६ अशी नमुद केलेली आहे. सदर हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीवेळी सदरची बाब लक्षात आलेली आहे. त्यामुळे रे.दि.मु.क्र. १८३/२०१३ च्या कामी झालेल्या न्यायनिर्णयामध्ये सदर चुकीने नमुद झालेला दावा 'अ' मिळकतीमधील अ.क्र. २ कडील मिळकतीचा स.क्र. ६२ हि.क्र. ६ ऐवजी स.क्र. ६३ हि.क्र. ६ अशी दुरूस्ती होवून मिळण्यासाठी अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. सदर अर्जाची नोटीस सामनेवाला यांना काढण्यात आली. परंतु नोटीसची बजावणी होवून देखील सामनेवाला क्र. ४ व ९ हे हजर न राहिल्यामुळे सदरचा अर्ज त्यांचेविरूध्द एकतर्फी चालविण्यात आलेला आहे. तसेच सामनेवाला क्र.१ ते ३, ५, ६, ७अ, ७ब व ८ यांनी हजर होवून देखील अर्जावर म्हणणे न दिल्यामुळे सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेविना चालविणेत येत आहे. सामनेवाला क्र. १० व ११ यांनी त्यांना सदरचा अर्ज मान्य असल्याबाबत पुरशिस (अनुक्रमे नि.१८ व नि.२२) दाखल केलेली आहे.

३. अर्जदार क्र.४ यांनी स्वत:करीता व अर्जदार क्र. १ ते ३ चे कुलअखत्यारी म्हणून पुराव्याचे सरतपासाचे शपथपत्र (नि.३१) दाखल केले आहे.

४. अर्जाच्या अनुषंगाने न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता न्यायनिर्णयामधील परिच्छेद क्र. २ मधील दावा 'अ' मिळकतीच्या वर्णनामध्ये अ.क्र.२ ची मिळकत ही स.क्र.६२ हि.क्र. ६ असे टंकलिखित झालेले आहे असे दिसून येते. सदरची चुक हि अनावधानाने व टंकलेखनाच्या चुकीमुळे झाल्याचे दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५२ मधील न्यायालयाच्या अधिकारीतेचा विचार करता न्यायालयास न्यायनिर्णय व हुकूमनाम्यामध्ये अभावित चुकभुलीमुळे उद्‌भवणा—या चुका कोणत्याही वेळी स्वत:हून किंवा पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकारांच्या अर्जावरून दुरूस्त करता येतात. त्यामुळे सदर अधिकाराचा वापर

करून याकामी न्यायनिर्णय व हुकूमनाम्यामध्ये झालेली वर नमुद अभावित चुक दुरूस्त होणे आवश्यक ठरते. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. न्यायनिर्णयामध्ये परिच्छेद क्र. २ मधील दावा 'अ' मिळकतीच्या सर्वे वर्णनामध्ये अ.क्र.२ च्या मिळकतीचा 'स.क्र.६२ हि.क्र. ६' ऐवजी 'स.क्र.६३ हि.क्र.६' असे नमुद करण्यात येत आहे.

२. न्यायनिर्णयामधील सदरची दुरूस्ती लघुलेखकाने करावयाची आहे.

३. वादी, प्रतिवादी यांना न्यायनिर्णयची दुरूस्ती नंतरची सहिसुद नक्कल मोफत दयावयाची आहे.

४. वादी व प्रतिवादींनी न्यायनिर्णयाच्या नक्कला घेतलेल्या असल्यास त्या त्यांनी हजर कराव्यात. त्यासाठी वादी, प्रतिवादी यांना नोटीसा काढणेत याव्यात.

५. अभिलेख कक्ष, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस येथून नियमित दिवाणी मुकदमा क्र. १८३/२०१३, निकाल तारीख ०२/१२/२०१५ चा अभिलेख मागविण्यात यावा.

सही/—

दिनांक:— १७/०८/२०१८

(म.सु. बुधवंत),
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी